महाराष्ट्र शासन महसुल विभाग
**उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी**
**चोपडा भाग चोपडा यांचे कार्यालय, चोपडा जि जळगांव**
दुरध्वनी क्र. ०२५८६-२२००७६ ई मेल- tahsildarchopda@gmail.com

क्रमांक/ दंडप्र./कावि/१२८/२०२१ दिनांक २४/०३/२०२१

**वाचले** :- १) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५
२) भारतीय साथरोग नियंत्रण अधिनीयम १८९७
३) महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२०
४) सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील अधिसुचना कोरोना /२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५ दि. १४ मार्च २०२०
५) मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण जळगांव यांचे आदेश क्र. दंडप्र./०१/कावि /६४ दि.२५/०३/२०२० नुसार Incident Commander म्हणुन प्रदान केलेले अधिकार
६) या कार्यालयाकडील पत्र क्र.दंडप्र./कावि/११२/२०२१ दि. १७ मार्च २०२१
७) मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण जळगांव यांचेकडील क्र.दंडप्र.-०१/कावि/ २०२१/६११ दि. १७/०३/२०२१

---

**आदेश**

ज्या अर्थी आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे व त्यातील पोटकलम २ (अ) नुसार मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत आणि ज्याअर्थी राज्य शासनाचे संदर्भिय २ अन्वये कोरोना विषाणुचा (कोव्हीड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि. १३ मार्च २०२० पासुन लागु करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदी ची अमंलबजावणीसाठी अधिसुचना निर्गमित केलेली आहे. त्याबाबतची नियमावली संदर्भिय ३ अन्वये प्रसिद्ध केली आहे. आणि मा. जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषीत केलेले आहे.

ज्या अर्थी मा. जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडील संदर्भिय ४ अन्वये उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी चोपडा भाग चोपडा यांची कोरोना विषाणूचा (कोव्हीड १९) संसर्ग, प्रादुर्भाव रोखण्यासाठी साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ आणि आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ या कायद्यातील तरतुदीच्या अमंलबजावणीसाठी Incident Commander म्हणुन तालुका चोपडा साठी नियुक्ती केलेली आहे.

ज्याअर्थी या कार्यालयामार्फत दि.२५/०३/२०२१ ते २८/०३/२०२१ या कालावधीत चोपडा तालुका क्षेत्रामध्ये कडक निर्बंध जाहीर करण्याच्या प्रस्तावास उपद्घोतातील क्र. ७ अन्वये मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,जळगांव यांनी मान्यता दिलेली आहे.

आणि ज्याअर्थी चोपडा तालुका हद्दीमध्ये कोविड-१९ बाधित व्यक्तींची संख्या दिवसेंदिवस वाढत असून नागरीकांना वेळोवेळी सुचना,निर्देश,आदेश निर्गमित करूनही नागरीक /व्यक्ती मोठ्या प्रमाणावर अनावश्यक सार्वजनिक ठिकाणी गर्दी करत असल्याचे दिसून येत असल्यामुळे कोविड-१९ विषाणूचा संसर्ग रोखण्यास अडचणी निर्माण होत आहेत.

ज्याअर्थी मागील वर्षी विविध स्वयंसेवी संस्था,व्यापारी संघटना,लोकप्रतिनिधी३, नागरीक यांनी स्वयंस्फुर्तीने पुकारलेल्या जनता कर्फ्यु च्या काळात बाधित रुग्णसंख्येमध्ये घट दिसुन आलेली होती. त्यामुळे कडक निर्बंध हा कोविड-१९ विषाणूचा संसर्ग रोखणेकामी प्रभावी उपाययोजना असल्याचे दिसुन आलेले आहे.

ज्याअर्थी कोविड-१९ विषाणूचा वाढता प्रसार व वाढती रुग्णसंख्या लक्षात घेता चोपडा तालुका क्षेत्रात दिनांक २०/०३/२०२१ व २४/०३/२०२१ या कालावधीसाठी नागरिकांचे व्यवहार, मुक्तपणे संचार यावर असे निर्बंध लागू करण्यांत आले होते व असे निर्बंध पुढील कालावधीसाठी सुरु ठेवणे गरजेचे आहे, याबाबत माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी मी **सुमित शिंदे, Incident Commander आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा उपविभागीय दंडाधिकारी चोपडा भाग चोपडा** भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन **संपूर्ण चोपडा तालुका क्षेत्रात दिनांक २५ मार्च २०२१ रोजी रात्री ००:०१ वाजेपासुन दिनांक २८ मार्च २०२१ रोजी रात्री २४:०० वाजेपावेतो** खालीलप्रमाणे निर्बंध लागू करण्यात येत आहेत.

१) **सर्व बाजारपेठा , आठवडी बाजार बंद राहतील.**

२) **किराणे दुकाने , Non-Essential इतर सर्व दुकाने बंद राहतील**

३) **किरकोळ भाजीपाला / फळे खरेदी विक्री केंद्रे बंद राहतील.**

४) **शैक्षणिक संस्था / शाळा / महाविद्यालय, खाजगी कार्यालय बंद राहतील.**

५) **हॉटेल / रेस्टॉरंट (होम डीलीव्हरी / पार्सल वगळता) बंद राहतील.**

६) **सभा / मेळावे / बैठका / धार्मिक स्थळे , सांस्कृतिक/ धार्मिक व तत्सम कार्यक्रम बंद राहतील.**

७) **शॉपींग मॉल/मार्केट, बार्बर शॉप, स्पा, सलुन, लिकर शॉप बंद राहतील.**

८) **गार्डन, पार्क, बगीचे, सिनेमागृहे, नाट्यगृहे, व्यायामशाळा, जलतरण तलाव प्रेषकगृहे, क्रिडास्पर्धा, प्रदर्शने, मेळावे, संमेलने बंद राहतील.**

९) **पानटपरी, हातगाड्या, उघड्यावर खाद्यपदार्थ विक्रीची ठिकाणे बंद राहतील.**

वरीलप्रमाणे लागू करण्यात आलेल्या निर्बंधातून **"दुध विक्री केंद्रे, वैद्यकीय उपचार व सेवा, मेडीकल स्टोअर्स, अम्ब्युलन्स सेवा, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागातील अधिकारी कर्मचारी, आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधीत घटक** यांना सुट देण्यात येत आहे. तसेच **दि. २५/०३/२०२१ व २६/०३/२०२१ या दोन दिवसांसाठी सकाळी ०७:०० वाजेपासून ते सायंकाळी १७:०० वाजेपर्यंत किराणा दुकाने सुरु ठेवण्यासाठी सुट देण्यात येत आहे आणि तसेच उक्त नमूद दोन दिवसांच्या कालावधीसाठी किरकोळ भाजीपाला व फळे यांची होम डिलीवरी तत्वावर विक्री करण्यासाठी सुट देण्यात येत आहे. उक्त नमूद सुट मिळालेल्या आस्थापनांसमोर गर्दी होणार नाही, सोशल डिस्टंसिंगचे पालन केले जाईल याची जबाबदारी संबंधित आस्थापना मालकांची राहिल. तसेच दि.२५/०३/२०२१ ते २८/०३/२०२१ रोजी पुर्व नियोजीत असलेल्या परिक्षांचे परिक्षार्थी व परिक्षेकरीता नेमण्यात आलेल्या अधिकारी / कर्मचारी यांना वर नमुद केलेल्या निर्बंधातुन सुट राहिल".**

वरीलप्रमाण चोपडा तालुका क्षेत्रात लागु करण्यात आलेल्या निर्बंधाच पालन होत आहे किंवा नाही याची जबाबदारी संयुक्तिकरीत्या पोलीस विभाग व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था यांची राहील.

सदर आदेशाचे उल्लघंन केल्यास सदर बाब ही भारतीय दंड संहिता,१८६० (४५) चे कलम १८८ आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम ५१ ते ६० व फौजदारी प्रक्रीया संहिता, १९७३ चे तरतुदीनुसार शिक्षेस पात्र राहील.

सदरचा आदेश हा आज दि. २४/०३/२०२१ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिला असे.

स्वा/-
सुमित शिंदे
(Incident Commander)
आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा
उपविभागीय दंडाधिकारी चोपडा

प्रत :- माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी

१) उपविभागीय पोलीस अधिकारी चोपडा
२) तहसिलदार चोपडा
३) गट विकास अधिकारी चोपडा
४) मुख्याधिकारी न. पा. चोपडा
५) पोलीस निरीक्षक चोपडा शहर पोलीस स्टेशन
६) सहा. पोलीस निरीक्षक चोपडा ग्रामिण पोलीस स्टेशन
७) सहा. पोलीस निरीक्षक अडावद पोलीस स्टेशन

२/- अनुक्रमांक ३ ते ७ यांनी आपल्या कार्यक्षेत्रात सार्वजनिक ठिकाणी असणारे ओटे, चावड्या व इतर मोकळया जागेत गर्दी होणार नाही याची दक्षता घ्यावी.

८) तालुका आरोग्य अधिकारी चोपडा
९) वैद्यकीय अधिक्षक उ. जि. रुग्णालय चोपडा
१०)सहा. निबंधक चोपडा
११)सचिव ,कृषी उत्पन्न बाजार समिती चोपडा
१२)व्यवस्थापक ,शेतकरी सहकारी संघ लि, चोपडा

प्रत :- १) मा. जिल्हाधिकारी जळगांव तथा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकारी , जळगांव यांना माहितीस्तव सविनय सादर

२) मा. पोलीस अधिक्षक जळगांव , यांना माहितीस्तव सविनय सादर.
३) अधिक्षक,राज्य उत्पादन शुल्क,जळगांव यांना माहितीस्तव सविनय सादर.
४) जिल्हा शल्य चिकीत्सक,जळगांव यांना माहितीस्तव सविनय सादर.
५) जिल्हा माहिती अधिकारी,जळगांव यांनी सदरील आदेशाचे जिल्हातील सर्व स्थानिक वर्तमानपत्रात विनामुल्य प्रसिद्धी देण्याबाबतची कार्यवाही करावी हि विनंती.
६) जिल्हा विज्ञान व सुचना अधिकारी जळगांव यांनी सदरील आदेशाचे jalgaon.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्याबाबतची कार्यवाही करावी हि विनंती.

सुमित शिंदे
(Incident Commander)
आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा
उपविभागीय दंडाधिकारी चोपडा

SUB-DIVISIONAL MAGISTRATE
उपविभागीय दंडाधिकारी
सत्यमेव जयते
चोपडा भाग,चोपडा
CHOPDA DIV.DIST.JALGAON